मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कासारवाडीत क्लोरीन, अनेक जण बेशुद्ध!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावात क्लोरीन गॅस लिकेज

**कासारवाडी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवडमध्ये मोठी दुर्घटना टळली आहे. शहरातील कासारवाडी येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावात क्लोरीन गॅस लिकेज झाल्याने पोहण्यासाठी आलेल्या व्यक्तींना श्वास घेण्याचा त्रास झाला. काहीजण बेशुद्ध झाल्याची माहिती समोर येत आहे. पोहण्यासाठी २२ जण आले होते. पैकी, ११ जणांना त्रास झाल्याने यशवंतराव चव्हाण रुग्णालयात नेण्यात आलं आहे. ही घटना सकाळी आठच्या सुमारास घडली. पिंपरी- चिंचवड शहरातील कासारवाडीत मोठी दुर्घटना टळली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावात सकाळी क्लोरीन गॅस लिकेज झाल्याने अनेकांना श्वास घेण्यास त्रास झाला. परिस्थिती अत्यंत भीषण होती. घटनास्थळी काहीजण बेशुद्ध झाल्याची माहिती देखील मिळत आहे



परिसरात ५०० मीटर पर्यंत क्लोरीन गॅस पसरला होता. त्यामुळे जलतरण तलावाच्या समोरून जाणारा रस्ता पोलिसांनी वाहतुकीसाठी बंद केला आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून घटनास्थळी पोलीस आणि अग्निशमन दल पोहोचलेलं आहे. सकाळच्या बॅचला २० ते २२ जण पोहण्यासाठी आले होते. पैकी ११ जणांना त्रास झाल्याने त्यांना महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयात नेण्यात आलं आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचा हलगर्जीपणा समोर आलेला आहे. या घटने प्रकरण महानगरपालिका कोणावर कारवाई करणार का? हे पाहणं महत्वाचं आहे.

# महामार्गावर विरुध्द दिशेने वाहने सुसाट!

## महामार्गालगत लोकवस्ती वाढल्यानेच रॉंगवे चे प्रमाण वाढले

**मनीषा थोरात-पिसाळ**

**मोशी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** नाशिक महामार्गावर लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढल्याने मोशीत रस्त्याच्या विरुध्द दिशेने येणारी वाहने अपघाताला कारणीभूत ठरत आहेत. अचानक समोर आलेल्या वाहनाला वाचविताना गंभीर अपघात घडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. रॉंगवे ने येणारी वाहने सुसाट असून, त्यांच्यावर कारवाई करण्याकडे पोलिस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज असल्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. महामार्गालगत लोकवस्त्या मोठ्या आहेत. त्यांना जवळपास जाण्यासाठी पर्यायी रस्ता नसल्याने महामार्गावरून विरूध्द दिशेने प्रवास करतात. याचा परिणाम अपघाताला आमंत्रण दिले जाते. मोशी रस्त्यावर असे प्रकार मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. पुणे-नाशिक महामार्गावर वाहने चालविणे चालकांसाठी धोकादायक ठरत आहे. विरुद्ध दिशेने वाहने येत असल्यामुळे अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. या विरुद्ध दिशेच्या वाहतुकीला खतपाणी मिळत असून, जो तो ज्याला वाटेल त्या दिशेने वाहने रस्त्यावर आणत आहे. यामुळे महामार्गावर लांब पल्ल्याच्या गाड्यांना वेगाला अचानक ब्रेक लावावा लागत आहे. रात्रीच्या वेळी समोरून आलेले वाहन वाचविताना चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे.भारत माता चौक तर विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांचे आगार असून, येथील वाहतूक कोंडीचे मुख्य कारण ही रॉंगवे ने येणारीच वाहने आहेत. नागेश्वरनगर बाजूने येणारी चारचाकी, दुचाकी वाहने यांची एक रांग विरुद्ध दिशेने लागत असून, यामुळे मुख्य रस्ता अरुंद झाला आहे. तसेच, यामुळे मुख्य प्रवाहातील वाहने अडकून पडलेली दिसून येतात.



### अपघातात वाढ

» मोशीतील मुख्य चौक, नागेश्वरनगर परिसर, देहू रस्ता परिसर, शिवाजीवाडी, टोलनाका, बोर्हाडेवाडी रस्ता, आदर्शनगर रस्ता येथून वाहने थेट मुख्य महामार्गावर येत असून, ते विरुद्ध दिशेनेच प्रवास करताना दिसून येतात. या वाहनांचा मोठा फटका पायी चालणारे आणि रस्ता ओलांडणारे प्रवाशी यांना बसत आहे. विरुद्ध दिशेने आलेले वाहन न दिसल्यामुळे अपघात झाल्याच्या कित्येक घटना गेल्या वर्षभरात घडल्या आहेत.

### नागरिकांची कारवाईची मागणी



» मोशीसारख्या उपनगरात रुग्णालये, महाविद्यालये, शाळा मोठ्या प्रमाणात आहेत. यामुळे रस्त्यावर लहान मुले, महिला, वयोवृद्ध यांची सतत रहदारी असते. यामध्ये अचानक विरुद्ध दिशेने आलेल्या वाहनांमुळे पादचारी भयभीत होतात. कधी-कधी अपघातग्रस्त होतात. यामुळे पोलिसांनी याकडे दुर्लक्ष न करता संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश सस्ते यांनी केली आहे.



“ महामार्गालगत वस्ती वाढल्याने विरुध्द दिशेने वाहतूक वाढली आहे. वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जाते. मात्र लोकवस्ती मधील नागरिकांना सर्व्हिस रस्ता किंवा पर्यायी रस्ता नसल्याने विरूध्द दिशेने महामार्गाचा वापर करतात. मोशी प्राधिकरण, पांजरपोळ, भारतमाता चौक या ठिकाणी असे विरूध्द दिशेने वाहन चालवण्याचे प्रमाण असते, त्यांच्या कारवाई केली जाते. मात्र विरुध्द दिशेने वाहन चालवणाऱ्यांनी स्वतः जीव आणि इतरांचा जीव धोक्यात घालू नये. कारवाई पेक्षा स्वतः च्या जीवाचा विचार करूनच वाहतूकीचे नियम पाळावे.

– दीपक साळुंके,
वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा

# शहरातील जलतरण तलावांचे होणार 'सुरक्षा ऑडिट'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या सूचना

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या हद्दीतील सर्व जलतरण तलावांचे 'सुरक्षा ऑडिट' करण्यात येणार आहे. त्याची तात्काळ कार्यवाही सुरू करण्यात येईल, अशी माहिती महापालिका क्रीडा विभागाचे अधिकारी मिनीनाथ दंडवते यांनी दिली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कासारवाडी जलतरण तलावात क्लोरीन गॅस लिकेज झाल्याची घटना घडली. त्यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने पोहोण्यासाठी आलेले नागरिक, जीवरक्षक, सुरक्षा रक्षक अशा २२ जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. यासंदर्भात माहिती मिळताच भाजपा आमदार महेश लांडगे यांनी तात्काळ रुग्णालयात धाव घेतली. उपचारार्थी नागरिकांच्या प्रकृतीची विचारपूस केली.



दरम्यान, या दुर्घटनेत खासगी रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या उपचाराचा खर्च पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने करावा. महापालिका प्रशासनाच्या वतीने शहरातील सर्व जलतरण तलावांचे सुरक्षा ऑडिट करावे. भविष्यात अशी घटना समोर येवू नये. संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावावी. तसेच, दोषींवर कारवाई करावी, अशी सूचनाही आमदार लांडगे यांनी केली.

> **कासारवाडी जलतरण तलावावर गॅस लिकेजची घटना घडली. यामुळे नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होवू लागला. रुग्णालयात दाखल करावे लागले. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. महापालिका प्रशासनाने गांभीर्याने या घटनेची चौकशी करावी. तसेच, सर्वच जलतरण तलावावरील संबंधित ठेकेदार, एजन्सी यांना सुरक्षा ऑडिट बंधनकारक करावे. नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करू नये, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# कर्मचाऱ्यांची दसऱ्यापूर्वीच दिवाळी!

## ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान, २० हजार जादा रक्कम जाहीर

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पिंपरी- चिंचवड महापालिका (झ्उचउ) कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान आणि जादा २० हजार रुपये रक्कम देण्यात येणार आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी हा निर्णय घेतला. त्यामुळे साडेआठ हजार कर्मचा-यांची दस-यापूर्वीच दिवाळी होणार आहे. पिंपरी – चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ आणि पिंपरी – चिंचवड महापालिका यांच्यात पंचवार्षिक वेतन करार झाला आहे. २०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंत हा करार आहे. दोनवर्षापूर्वी करार करताना पाच हजार रुपयांनी सानुग्रह अनुदानात वाढ केली होती. त्यानुसार वर्ग १ ते ४ मधील



अधिकारी, कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान आणि जादा २० हजार रुपये रक्कम देण्यास आयुक्तांनी मान्यता दिली आहे. या बोनसचा महापालिकेतील साडेआठ हजार कर्मचा-यांना लाभ होणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शाखाधिकारी व शाखाप्रमुख यांनी २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदान व जादा रक्कम अदाईगी करण्याच्या लेखा (झउचउ ) शीर्षकाखाली केलेली तरतूद अपुरी पडल्यास तरतूद वर्गीकरणाची कारवाई करावी. तसेच ८.३३ टक्के सानुग्रह अनुदान आणि जादा २० हजार रुपये रक्कम सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी पूर्वी मिळेल याची दक्षता घ्यावी. त्याबाबतची बिले तयार करून तातडीने लेखा विभागाकडे सादर करावीत. लेखा विभागाने तातडीने बिले तपासून रक्कम अदाईगी संदर्भातील कार्यवाही करावी. बिलांच्या विलंबाबाबत शाखा प्रमुखांना जबाबदार धरण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

# त्या एजन्सीला नोटीस, गुन्हाही दाखल करणार

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
जलतरण गॅस गळती प्रकरणी तलावातील पाणी शुद्धीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्तीचे काम करणाऱ्या सुमित स्पोर्टस अ‍ॅन्ड फिटनेस इक्विपमेंट एजन्सीला नोटीस देण्यात आली आहे. तातडीने खुलासा मागविला असून गुन्हाही दाखल करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलाव येथे क्लोरिन गॅसचे टाकीतून क्लोरीन गॅस गळती झाली. ही बाब जलतरण तलावावरील व्यवस्थापक, जीवरक्षक यांचे लक्षात येताच जलतरण तलावामधील १६ नागरिकांना तातडीने बाहेर काढले. यापैकी १२, नागरीक ४ जीवरक्षक, १ सुरक्षारक्षक यांना त्रास जाणवू लागल्याने यशवंतराव चव्हाण रुग्णालयात दाखल करण्यात आले. दाखल केलेल्या सर्वांची प्रकृती स्थिर आहे. तसेच टाकीतून होणाऱ्या गॅस गळतीवर तातडीने नियंत्रण मिळविण्यात आले. जलतरण तलावातील पाणी शुद्धीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्तीचे काम सुमित स्पोर्टस अ‍ॅन्ड फिटनेस इक्विपमेंट यांना नेमून दिलेले आहे. क्लोरिन गॅसची टाकी अत्यंत जुनी गंजलेली खराब अवस्थेत असल्याने याबाबत काम करणा-या एजन्सीने आवश्यक खबरदारी न घेता हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास आले आहे.

# अजित पवारांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदाचा दिला राजीनामा!

## रिक्त झालेल्या जागेवर कुणाची वर्णी लागणार?

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा दिला आहे. अजित पवारांनी राजीनामा दिल्यानं राज्यातील राजकारणात चर्चेला उधाण आलं होतं. यावर पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. राज्यात पक्ष संघटनेसाठी द्यावा लागणारा वेळ, उपमुख्यमंत्री पदाच्या कार्यबाहुल्यामुळे बँकेच्या कामकाजात लक्ष देता येत नाही तसेच बैठकांना उपस्थित राहता येत नसल्याचे कारण दिल्याने बँकेच्या संचालक मंडळाने त्यांचा राजीनामा मंजूर केला आहे.

अजितदादा राजकारणात सक्रिय झाल्यानंतर १९९१ साली पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक झाले.
तेव्हापासून ते आतापर्यंत सुमारे ३२ वर्ष त्यांनी संचालक म्हणून काम पाहिले. चारवेळा उपमुख्यमंत्रीपद भूषविलेल्या अजित पवार यांना एकनाथ शिंदे आणि भाजपचे देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये पाचव्यांदा उपमुख्यमंत्री पद भूषविण्याची संधी मिळाली. ही संधी मिळाल्याने अजित पवार यांचा गट बाहेर पडून सत्तेत सहभागी झाला. मात्र, तेव्हापासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार




आणि अजित पवार हे दोन गट पडले आहेत. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाची जानेवारी २०२१ मध्ये निवडणूक झाली. त्यावेळी संचालक मंडळाच्या प्रचारार्थ पुण्यात झालेल्या सभेवेळी अजितदादांनी, 'आपण निवडणूक लढविण्यास इच्छुक नाही. दिलीप वळसे पाटील, दत्तामामा भरणे यांच्यासह संचालक मंडळाच्या आग्रहाखातर आपण पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहोत,' असे जाहीरपणे सांगितले होते. बँकेच्या तीन बैठकांना उपस्थित राहणे हे संचालकांवर बंधनकारक आहे. 'राज्याच्या सत्तेत सहभागी झाल्याने राष्ट्रवादीचे पक्ष संघटनासाठी वेळ द्यावा लागत आहे. तसेच उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभाराचा व्याप अजितदादांवर वाढला आहे.
त्यामुळे बँकेच्या प्रत्येक बैठकींना अजितदादांना उपस्थित राहणे शक्य होत नाही. बँकेच्या गेल्या बैठकीला ते अनुपस्थित होते. तसेच दादांच्या वेळेनुसार, बँकेच्या बैठकांची वेळ ठरविणे प्रत्येक वेळी शक्य नाही. काही निर्णय़ त्या त्या वेळी घेणे गरजेचे असल्याने दादांच्या वेळेनुसार बैठक घेणे योग्य ठरणार नाही.

### बँकेने विविध योजना राबविल्या

**» अजितदादांनी बँकेचा राजीनामा दिला आहे,' असे संचालकांनी सांगितले. १९९१ साली बँकेचा व्यवसाय हा ५५८ कोटी रुपयांचा होता. तो आता २० हजार ७१४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. अजितदादांच्या नेतृत्वाखाली बँकेने विविध योजना राबविल्या. एटीएम, गुगल पे सुविधा, शेड्युल बँकेचा दर्जा तसेच देशातील आघाडीची बँक म्हणून नावलौकिक मिळविला आहे. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाची जानेवारी २०२१ मध्ये निवडणूक झाली. त्यावेळी संचालक मंडळाच्या प्रचारार्थ पुण्यात झालेल्या सभेवेळी अजितदादांनी, 'आपण निवडणूक लढविण्यास इच्छुक नाही.**

# सांडपाणी प्रकल्पाचा सव्वा चारशे कोटीचा आराखडा केंद्राकडे

## महापालिकेने २००८ पूर्वी शहरात उभारले होते १० मैला शुद्धीकरण केंद्र

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
शहरातील महापालिकेचे कालबाह्य झालेले सहा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्ययावत करण्यासाठीच्या सर्वंकष प्रकल्प आराखड्यास (डीपीआर) महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरणाने (एमजीपी) मान्यता दिली आहे. त्यामुळे आता केंद्र शासनाकडून या प्रकल्पास अंतिम मान्यता मिळण्यासह या कामासाठी ४२५ कोटी रुपयांचा निधी मिळण्याचाही मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान हा आराखडा मंजुरीचे काम संथ गतीने सुरु असल्याचे वृत्त 'न्यूज एक्स्प्रेसने ऑगस्ट महिन्यात दिले होते. शहरात वाहणाऱ्या मुळा नदीमध्ये प्रक्रिया न केलेले घरगुती व उद्योगांचे



सांडपाणी येत असल्याने प्रदूषण वाढले आहे. नदीतील बीओडीचे प्रमाण कमी करून, सोओडी आणि विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. महापालिकेने २००८ पूर्वी शहरात १० मैला शुद्धीकरण केंद्र उभारले. त्यापैकी नऊ प्रकल्प सध्या अस्तित्वात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सुधारित निकषानुसार पाण्यातील बीओडीचे प्रमाण हे ३० मिलीग्रॅमऐवजी १० मिलीग्रॅम पर्यंत कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या ९ पैकी ६ प्रकल्पांमध्ये 'एसबीआर' हे तंत्रज्ञानाचा नसल्याने निकषांची पूर्तता होत नव्हती. त्यामुळे विठ्ठलवाडी, एरंडवणा, बोपोडी, भैरोबानाला, तानाजीवाडी, नायडू या सहा प्रकल्पांमधील तंत्रज्ञान अद्ययावत करण्याचा निर्णय घेतला. यासाठी 'महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित'ला (महाप्रित) सल्लागार म्हणून नियुक्त केले आहे. 'महाप्रित'ने सहा प्रकल्पांचा ४२५ कोटी रुपयांचा सुधारित आराखडा तयार केला असून, यासाठी केंद्र सरकारच्या 'अमृत' योजनेतून निधी प्राप्त होणार आहे.
'महाप्रित'ने तयार केलेला डीपीआर 'एमजीपी' तपासणीसाठी पाठविला होता. त्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच वेळेस महापालिकेने हा प्रकल्प आराखडा केंद्र सरकारकडेही पाठवलेला आहे. एमजीपीने मान्यता दिल्याने केंद्राकडूनही त्यास मान्यता मिळेल. तसेच यासाठी निधी लगेच प्राप्त होणार असून, एका महिन्यात निविदा प्रक्रिया सुरु करू. या सहा प्रकल्पांचे काम पूर्ण झाल्यानंतर शुद्धीकरणाचे प्रमाण वाढेलच, शिवाय सांडपाणी शुद्ध करण्याचे प्रमाण ९९ एमएलडीने वाढणार आहे, असा दावा प्रशासनाने केला आहे.

> **'शहरातील ९ पैकी ६ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील तंत्रज्ञान अद्ययावत करण्याचा आराखडा एमजीपीने मान्य केला आहे. या आराखड्यास केंद्र सरकारकडून त्वरित मान्यता मिळेल. पुढील महिन्याभरात ही मान्यता मिळाल्यानंतर लगेच निविदा प्रक्रिया राबविली जाईल. या प्रकल्पामुळे मुळामुठा नदीतील शुद्ध पाण्याचे प्रमाण वाढणार आहे,'**
>
> **- श्रीनिवास कंदूल,**
> **मुख्य अभियंता, विद्युत विभाग**

# ड्रग्ज माफिया ललित पाटील पळून जाण्यात मंत्री दादा भुसे यांचा हात!

## सुषमा अंधारे यांचा सनसनाटी आरोप

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यात शेकडो कोटींच्या ड्रग्स प्रकरणात रोज नवनवीन धक्कादायक खुलासे होत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी ललित पाटील हा ससून रुग्णालयातून पळून गेला आहे.

ललित पाटील हा ससून मधून पळून गेल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिवसेना नेते तथा महाराष्ट्र सरकारमधील मंत्री दादा भुसे यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. ललित पाटील याला ससून रुग्णालयात दाखल करण्यासाठी शिवसेना नेते दादा भुसे यांनी रुग्णालय प्रशासनाला फोन केला होता, असा गंभीर आरोप अंधारे यांनी केलाय. मंत्री दादा भुसे यांचे कॉल रेकॉर्ड चेक करा, खरी माहिती समोर येईल, असा दावा देखील सुषमा अंधारे यांनी केला आहे. ससून रुग्णालय प्रशासन ललित पाटील याला दाखल करण्यास नकार दिला होता, असं सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत. मी आता थेट माहिती घेते. मी नाव घेताना असं सांगतेय की, या सगळ्यात दादा भुसे यांच्या नावाच्या अवतीभोवती संशयाचं धुकं असेल तर त्यांचे कॉल रेकॉर्ड का चेक केलं जात नाही? दादा भुसे यांना प्रश्न का विचारले जाऊ नयेत? गृह खात्याची याप्रकरणाचा खरंच छडा लावण्याची इच्छाशक्ती असेल तर त्यांनी हा विषय स्पष्ट करायला हवा, असं सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत. दरम्यान, याआधी ड्रग्ज माफिया ललित पाटील पळून जाण्यात शिंदे गटातील एका मंत्र्याचा हात असल्याचा आरोप काँग्रेसचे कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला होता. आमदार रवींद्र धंगेकर यांनी आज ससूनचे डीन डॉ. संजीव ठाकूर यांची भेट घेऊन ललित पाटील याच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांची माहिती मागितली. मात्र डीन यांनी ही माहिती देण्यास नकार दिल्याने आमदार रवींद्र धंगेकर यांनी डीनच्या केबिनमध्येच ठिय्या मांडला होता. रवींद्र धंगेकर यांच्या या आरोपांनंतर सुषमा अंधारे यांनी थेट नावच जाहीर केल्याने राज्यातील वातावरण कमालीचं तापलं आहे.



### दादा भुसे कॉल रेकॉर्ड का चेक केलं जात नाही?

» मी नाव घेताना असं सांगतेय की, या सगळ्यात दादा भुसे यांच्या नावाच्या अवतीभोवती संशयाचं धुकं असेल तर त्यांचे कॉल रेकॉर्ड का चेक केलं जात नाही? दादा भुसे यांना प्रश्न का विचारले जाऊ नयेत? गृह खात्याची याप्रकरणाचा खरंच छडा लावण्याची इच्छाशक्ती असेल तर त्यांनी हा विषय स्पष्ट करायला हवा, असं सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत. दरम्यान, याआधी ड्रग्ज माफिया ललित पाटील पळून जाण्यात शिंदे गटातील एका मंत्र्याचा हात असल्याचा आरोप काँग्रेसचे कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला होता.

# महापालिकेत समाविष्ट २३ गावांसाठी उपायुक्तांसह २८ अधिकारी नियुक्त!

## उपायुक्त आशा राऊत यांच्याकडे १२ गावांची जबाबदारी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनातर्फे ४ उपायुक्त, ८ सहाय्यक आयुक्त आणि १६ संपर्क अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयुक्त तथा प्रशासक विक्रम कुमार यांनी संदर्भात परिपत्रक काढले आहे. विशेष म्हणजे उपायुक्त आशा राऊत यांच्याकडे १२ गावांची जबाबदारी दिली आहे. पुणे महापालिकेने जुलै २०२१ मध्ये हद्दीलगतची २३ गावे समाविष्ट करण्यात आली आहेत. पण या गावातील पाणी, कचरा, रस्ते, सांडपाणी, पावसाळी गटार, पथदिवे यांचा अभाव असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. यासंदर्भात विविध राजकीय पक्षांनी आंदोलने केली आहेत. विधिमंडळ अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यानंतर या गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठित करण्यात येणार होती. याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असला तरी त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. दरम्यान आयुक्तांनी या गावांमध्ये सुविधा पुरविण्यासाठी आणि समस्या सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.



अधिकाऱ्यांना जबाबदारीचे वाटप करताना गावाची हद्द व लोकसंख्या लक्षात घेत २३ गावांची जबाबदारी वाटप करण्यात आली आहे. वाघोली, बावधन बुद्रुक ही दोन्ही गावे मोठी असल्याने या गावांसाठी एक उपायुक्त, एक सहाय्यक आयुक्त, दोन संपर्क अधिकारी आहेत.

# द्रुतगती मार्गावर जाणारी वाहतूक दोन तास बंद!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटातील अमृतांजन ते खंडाळा बोगद्यादरम्यान ओव्हरगेड गॅन्ट्री बसविण्याचे काम मंगळवारी दुपारी पूर्ण झाले. द्रुतगती मार्गावरील वाहतूक मंगळवारी दुपारी १२ ते २ दरम्यान बंद करण्यात आली होती. मुंबईहून पुण्याकडे जाणारी हलकी वाहने जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाने लोणावळ्याकडे वळविण्यात आली. या कामामुळे द्रुतगती मार्गावरून पुण्याकडे जाणारी वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून द्रुतगती मार्गावर 'आयटीएमएस' प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीअंतर्गत द्रुतगती मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. वाहतूक नियमभंग करणारे वाहनचालक या यंत्रणेद्वारे टिपले जाणार आहेत. या यंत्रणेद्वारे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांना त्वरित दंड पाठविण्यात येणार आहे. नियमभंग करणाऱ्या वाहनक्रमांकाच्या पाटीवरील क्रमांकावरून वाहनचालकांना दंडाचा संदेश मोबाइलद्वारे मिळणार आहे. द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटातील अमृतांजन ते खंडाळा बोगद्यादरम्यान ओव्हरहेड गॅन्ट्री बसविण्याचे काम मंगळवारी दुपारी १२ ते २ या वेळेत करण्यात आले. त्यासाठी द्रुतगती मार्गावरून पुण्याकडे जाणारी वाहतूक दोन तास थांबविण्यात आली होती.